February 24, 2017

BSE Limited
National Stock Exchange of India Limited

Kind Attn.: Manager- Corporate Relationship

Dear Sir,

**Sub: Notice of NCLT Convened Meeting of Shareholders of the Company for Scheme of Arrangement & Amalgamation.**

Further to our communication dated February 23, 2017 and in accordance with SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we hereby enclose copy of Notice of NCLT Convened Meeting of Equity Shareholders of the Company published in 'Navshakti' today.

Kindly acknowledge receipt.

**For Zee Media Corporation Limited**

Pushpal Sanghavi
**Company Secretary**

Encl. As above

मुंबई नवशक्ति
मुंबई, शुक्रवार, २४ फेब्रुवारी २०१७

ZEE MEDIA
|| VASUDHAIVA KUTUMBAKAM || THE WORLD IS MY FAMILY

# झी मिडिया कॉर्पोरेशन लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** कॉन्टिनेंटल बिल्डिंग, १३५, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८
**फोन :** +९१ २२ ७१०६ १२३४, **फॅक्स क्र. :** ९१ २२ २३०० २१०७,
**सीआयएन-** एल९२१००एमएच१९९९पीएलसी१२१५०६, **वेबसाईट :** www.zeenews.india.com
**ईमेल :** complianceofficer@zeemedia.esselgroup.com

## समभाग धारकांच्या सभेची सूचना

**प्रपत्र क्र. सीएए.२ (कलम २३०(३) आणि नियम ६ आणि ७ अनुसार)**
**कंपनी योजना अर्ज क्र. १३८ सन २०१७**

**झी मिडिया कॉर्पोरेशन लिमिटेड.....**

**अर्जदार कंपनी**

सूचना याद्वारे देण्यात येते की, दिनांक ३ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या आदेशाद्वारे राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाच्या मुंबई बेंच यांनी झी मिडिया कॉर्पोरेशन लिमिटेड आणि डिलिजंट मिडिया कॉर्पोरेशन लिमिटेड आणि मिडियावेस्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि प्रि-मिडिया सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड आणि मौर्या टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड आणि त्यांचे संबंधित भागधारक आणि धनको व्यवस्था आणि एकत्रिकरणाची योजना (''योजना'') सुधारणेशिवाय किंवा सह विचारात घेणे आणि योग्य वाटल्यास मंजूर करण्यासाठी अर्जदार कंपनीच्या समभागधारकांची सभा घेण्याचे निर्देश दिले आहेत.

सदर आदेश आणि त्यातील निर्देशानुसार पुढे सूचना याद्वारे देण्यात येते की, अर्जदार कंपनीच्या समभागधारकांची सभा ही सोमवार, २७ मार्च, २०१७ रोजी स. ११.०० वा. हॉल ऑफ कल्चर, नेहरु सेंटर, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८ येथे घेण्यात येणार आहे. त्यावेळी आणि ठिकाणी १७ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या कट-ऑफ तारखेस कंपनीच्या समभागधारकांना हजर राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० अंतर्गत योजना आणि विवरणपत्राची प्रत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून किंवा तिचे वकील मे. हेमंत सेठी ॲण्ड कं., १६०२, नव परमाणु, अमर सिनेमाच्या मागे, चेंबूर, मुंबई-४०० ०७१ यांच्या कार्यालयातून विनामूल्य प्राप्त करता येईल. सभेला हजर राहून मतदान करण्यासाठी हक्कदार असलेली व्यक्ती व्यक्तिश: किंवा प्रतिपत्री व्यक्तीद्वारे मतदान करू शकते मात्र विहित प्रपत्रातील सर्व प्रतिपत्री प्रपत्र सभेपूर्वी किमान ४८ तास अगोदर कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

प्रतिपत्री प्रपत्र कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून प्राप्त करता येतील.

न्यायाधिकरणाने सदर सभेचे अध्यक्ष म्हणून अर्जदार कंपनीचे श्री. सुरजित बंगा, विना-कार्यकारी अध्यक्ष आणि ते नसल्यास श्री. राजिव सिंग, कार्यकारी संचालक आणि चिफ ऑपरेटिंग ऑफिसर, ते नसल्यास सौ. उमा मांडवगणे, स्वतंत्र संचालक यांची नियुक्ती केली आहे. वरील नमूद योजना, त्यांच्या समभाग धारकांद्वारे जरी मंजूर करण्यात आली तरीही ती त्यानंतर न्यायाधिकरणाच्या मंजुरीच्या अधीन राहील.

सन्माननीय न्यायाधिकरणाने जारी केलेल्या निर्देशांनुसार आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ आणि ११० सहवाचता कंपनीज् (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स २०१४ च्या नियम २० आणि २२ आणि आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ ('सेबी एलओडीआर रेग्युलेशन्स') च्या तरतुदींनुसार कंपनीच्या समभाग धारकांना नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे पुरविलेल्या दूरस्थ ई-मतदानामार्फत किंवा पोस्टल बॅलटच्या मार्गाने सभेशी संबंधित जारी केलेल्या दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या सूचनेतील प्रस्तावित मसुद्यानुसार योजना मंजूर करण्याच्या ठरावावर मतदान करण्याचा पर्याय देण्यात आला आहे आणि या संदर्भात भागधारकांनी नोंद घ्यावी की:

- २२ फेब्रुवारी, २०१७ रोजी कंपनीने परवानगी असलेल्या पध्दतीने सर्व समभाग धारकांना (१७ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या कट-ऑफ तारखेनुसार) ठरावाचा मसुदा नमूद केलेल्या सूचनेसह तिच्या जोडपत्रासह पोस्टल बॅलट प्रपत्र आणि व्यवसाय उत्तर लिफाफा पाठविण्याचे काम आणि ज्या सभासदांनी कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंटस्कडे त्यांचे ई-मेल पत्ते नोंदविलेले आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिकली पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे.
- सदर सभेची सूचना कंपनीची वेबसाईट www.zeenews.india.com वर आणि बीएसई आणि एनएसईच्या वेबसाईट्स तसेच नॅशनल सिक्युरिटी डिपॉझिटरीज् लिमिटेड (एनएसडीएल) ची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर सुध्दा उपलब्ध आहे.
- पोस्टल बॅलट / दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान करण्याचा कालावधी शनिवार, २५ फेब्रुवारी, २०१७ रोजी स. ९.०० वा. सुरु होईल आणि रविवार, २६ मार्च, २०१७ रोजी सायं. ५.०० वा. संपेल. दूरस्थ ई-मतदान सुविधा त्यानंतर बंद करण्यात येईल.
- भागधारक रविवार, २६ मार्च, २०१७ रोजी सायं. ५.०० वा. किंवा पूर्वी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात व्यवसाय उत्तर लिफाफ्यामधून यथायोग्य भरलेले आणि सही केलेले पोस्टल बॅलट प्रपत्र पाठवून पोस्टल बॅलटच्या मार्गाने प्रस्तावित ठरावावर त्यांचे मतदान करू शकतात. सदर तारीख आणि वेळेनंतर प्राप्त झालेले पोस्टल बॅलट प्रपत्र हे काटेकोरपणे सभासदाकडून उत्तर प्राप्त झाले नसल्याचे म्हणून समजण्यात येतील.
- ज्या सभासदांना पोस्टल बॅलट प्रपत्र प्राप्त झालेले नाहीत ते कंपनीकडे अर्ज करू शकतात आणि complianceofficer@zeemedia.esselgroup.com येथे ईमेल पाठवून त्याची प्रतिलिपी प्राप्त करू शकतात.
- कोणीही सभासद ज्यांनी पोस्टल बॅलटमार्फत किंवा दूरस्थ ई-मतदानामार्फत अगोदर त्यांचे मतदान केलेले आहे ते सभेला हजर राहू शकतात परंतु सभेत मतदान करण्याची परवानगी त्यांना देण्यात येणार नाही.
- सभासद मतदानाशी संबंधित कोणतीही चौकशी / तक्रारीकरिता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा ०२२ ७१०६ १२३४ वर किंवा complianceofficer@zeemedia.esselgroup.com येथे ईमेल पाठवून कंपनी सचिवांना संपर्क करू शकतात.
- सन्माननीय न्यायाधिकरणाच्या निर्देशानुसार, एसीएस विनिता नायर, भागीदार, मे. विनोद कोठारी ॲण्ड कं., कंपनी सेक्रेटरीज आणि त्या नसल्यास श्री. सतिश शाह, कार्यरत कंपनी सेक्रेटरी हे इलेक्ट्रॉनिकली किंवा पोस्टर बॅलटद्वारे किंवा सभेत मतपत्रिकेद्वारे झालेल्या मतदानाचे परिनिरीक्षण करण्यासाठी परिनिरीक्षक म्हणून काम करतील.
- मतदानाचे निरीक्षण हे सोमवार, २७ मार्च, २०१७ रोजी नियोजित सभेत पोस्टल बॅलट, दूरस्थ ई-मतदान आणि मतपत्रिकेद्वारे मतदानावरील मतदानाचा परिनिरीक्षकांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरित कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात घोषित करण्यात येतील. मतदान निष्कर्षाचा तपशील सदर तारखेस स्टॉक एक्स्चेंजला पाठविण्यासह कंपनीची वेबसाईट www.zeenews.india.com वर सुध्दा दर्शविण्यात येईल.

**सुरजित बंगा**
**सभेकरिता नियुक्त अध्यक्ष**

मुंबई, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१७